महाराष्ट्र शासन

दुरध्वनी क्रं. - 02462-244474, 234504
फॅक्स क्रं. - 02462-235103

नियंत्रण कक्ष क्रं. - 02462-234720
E-mail Id- sp.nanded@mahapolice.gov.in, pronanded@gmail.com

जा.क्रं. / प्रेस नोट/161/ पोलीस अधीक्षक कार्यालय,नांदेड /2025 दिनांक : 21/04/2025

# शहर वाहतूक शाखा वजिराबाद व इतवारा यांची अवैध प्रवाशी वाहतूक, विना वाहन परवाना चालणारी वाहने, गणवेश परीधान न करणारे ॲटोचालक यांचेवरती धडक कारवाई करून 3,69,350/—रूपयाचा दंड आकारण्यात आला..

**मा. श्री. अबिनाश कुमार**, पोलीस अधीक्षक, नांदेड यांनी शहरात वाढत असलेली ट्राफिक समस्या अटोक्यात आणनेसाठी शहरात चालणारी अवैध प्रवाशी वाहतूक तसेच विना परवाना/परमिट चालणारे वाहणे, भरधाव वेगाने चालणारी वाहने, यांचेवरती कार्यवाही करण्याची मोहीम राबविणे बाबत शहर वाहतूक शाखा वजिराबाद व इतवारा यांना आदेशीत केले होते.

त्या अनुषंगाने दिनांक 20.04.2025 रोजी प्रभारी अधिकारी श्री **साहेबराव गुट्टे**, पोलीस निरीक्षक, शहर वाहतूक शाखा, वजिराबाद यांनी सिटीबी स्टाफ व दंगल नियंत्रण पथकातील पोलीस अंमलदार यांचे समवेत रेल्वे स्थानक,महाराणा प्रताप चौक, तरोडेकर मार्केट व कलामंदिर येथील वाहतूकीस अडथळा निर्माण होणारे अवैध अतिक्रमण करणाऱ्यांवर व वाहनावर दंडात्मक कार्यवाही करून 1) पेड केसेस 18 = 6,600 रूपयाचा दंड 2) ऑनलाईन युपीआयव्दारे केसेस 08 = 6,250 रूपयाचा दंड 3) अनपेड केसेस 133 = 1,83,500 रूपयाचा दंड, 4) ट्रिपल सिटच्या 06 केसेस 6,000 रूपयाचा दंड 5) गणवेश परीधान न करणारे ॲटो चालक 57 केसेस 48,500 रूपयाचा दंड अशा **एकुण 222 केसेस करून 2,50,850/— रूपयाचा दंड आकारण्यात आला.**

तसेच दिनांक 20.04.2025 रोजी प्रभारी अधिकारी श्री **राजकुमार हिंगोले**,सहा.पोलीस निरीक्षक, शहर वाहतूक शाखा, इतवारा यांनी स्टाफ व दंगल नियंत्रण पथकातील पोलीस अंमलदार यांचे समवेत देगलूर नाका, जुना मोंढा व बर्की चौक या ठिकाणी वाहणाची कागदपत्रे तपासणी केली दरम्यान कागदपत्र नसल्यामुळे, गणवेश परिधान न करणारे ऑटो चालक, तसेच विना परवाना चालणारे वाहन, अवैध प्रवाशी वाहतूक व इतर केसेस अशा **एकुण 126 केसेस करून एकुण 1,18,500/— रूपयाचा दंड आकारण्यात आला.**

शहर वाहतूक शाखा वजिराबाद व इतवारा यांनी नांदेड शहरात मोहीम राबवुन अवैध प्रवाशी वाहतूक, वाहतुकीस अडथळा करणारे विना परवाना/परमिट चालणारे वाहणे, भरधाव वेगाने चालणारी वाहने गणवेश परिधान न करणारे ॲटो चालक यांचेवर एकत्रीत 348 केसेस करून एकुण 3,69,350/—रू दंड आकारण्यात आला आहे.

सदरची कारवाई **मा. श्री अबिनाश कुमार**, पोलीस अधीक्षक नांदेड, **मा. श्री सुरज गुरव**, अपर पोलीस अधीक्षक नांदेड, यांचे मार्गदर्शनाखाली अधीकारी/अंमलदार शहर वाहतूक शाखा वजिराबाद, इतवारा, दंगल नियंत्रण पथकातील पोलीस अंमलदार यांनी केली आहे.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड